आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१४ मार्च २०२६ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- आसाममध्ये साडेतेवीस हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भूमिपूजन आणि पायाभरणी

- कोलकाता इथंही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते १८ हजार कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि भूमीपूजन होणार

- सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांना राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांतर्गत झालेली नजरकैद सरकारकडून रद्द

**आणि**

- एफ.आय.एच. महिला हॉकी विश्वचषक पात्रता फेरीच्या अंतिम सामन्यात आज भारताचा मुकाबला इंग्लंडशी होणार

**<><><><><>**

आसामच्या युवकांना स्टार्ट अप्ससाठी सहाय्य आणि प्रोत्साहन द्यायला केंद्र सरकार वचनबद्ध असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज आसाममध्ये सिलचर जिल्ह्यातल्या साडेतेवीस हजार कोटी रुपयांहून अधिक मूल्याच्या विविध विकास कामांची दूरस्थ पद्धतीने पायाभरणी केल्यावर बोलत होते. यामध्ये सिलचरमधील उड्डाणपूल, पाथरकंडी कृषी महाविद्यालयाचा समावेश आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचा पहिला हप्ता आपण काल आसाममध्ये वितरित केला असं मोदी यांनी सांगितलं. रालोआ सरकार शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार प्रधानमंत्री मोदी यांनी केला.

**होल्ड.. बाईट - प्रधानमंत्री**

शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ आणि शेतीचं आधुनिकीकरण यांना सर्वोच्च प्राधान्य दिलं जात असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. चहा उत्पादक शेतकऱ्यांनाही जमिनीशी संबंधित सर्व अधिकार प्रदान करणार असल्याचं ते म्हणाले. ऑईल इंडिया लिमिटेडच्या क्षमता वृद्धी प्रकल्पाचंही प्रधानमंत्र्यांनी यावेळी राष्ट्रार्पण केलं.

आसाम दौऱ्यानंतर आज प्रधानमंत्री कोलकाता इथंही १८ हजार कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि भूमीपूजन करतील. या प्रकल्पांमध्ये रस्त्यांच्या पायाभूत सुविधांना बळ देण्यावर भर दिला असून, त्या अंतर्गत महामार्गांचा समावेश असलेल्या ४२० किलोमीटर लांबीच्या रस्ते प्रकल्पांची पायाभरणी मोदी यांच्या हस्ते होणार आहे. तसंच विविध जहाज वाहतूक, बंदरे, रेल्वे आदींशी निगडीत प्रकल्पांचाही यामध्ये समावेश आहे.

<><><><>

इसरो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संघटनेच्या तामिळनाडूमधल्या महेंद्रगिरी इथल्या इसरो प्रॉपल्शन केंद्र परिसरात २२ टन थ्रस्टच्या सीई-20 क्रायोजेनिक इंजिनचं यशस्वी चाचणी करण्यात आली. केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी याबद्दल इसरोचं अभिनंदन केलं आहे. या चाचणीमुळे देशाची प्रगत क्रायोजेनिक प्रणोदन क्षमता अधिक मजबूत झाली असून एलवीएम-3 कार्यक्रमाची विश्वासार्हता उंचावली आहे, असं जितेंद्र सिंह यांनी म्हटलं आहे.

<><><><>

लोकायन - २६ या मोहिमेअंतर्गत सुमारे २२ हजार सागरी मैलांच्या प्रवासावर निघालेलं भारतीय नौदलाचं जहाज आयएनएस सुदर्शिनी, माल्टा देशातल्या वालेट्टा बंदरावर पोहोचलं आहे. जहाजाच्या कमांडिंग अधिकाऱ्यांनी माल्टा इथल्या भारतीय उच्चायुक्त रचिता भंडारी यांची भेट घेतली आणि उभय देशातले द्विपक्षीय संबंध मजबूत कारण्यामधली भारतीय नौदलाची भूमिका अधोरेखित केली.

<><><><>

पीएम लॅपटॉप योजना या नावानं लॅपटॉप वितरण किंवा २५ हजार रुपयांचं आर्थिक सहाय्य विद्यार्थ्यांना दिलं जात असल्याच्या कथित योजनेचं आज केंद्र सरकारनं खंडन केलं आहे. याबाबत प्रसिद्ध करण्यात आलेला यु ट्यूब व्हिडीओ बनावट असून अशा प्रकारची कोणतीही योजना अस्तित्वात नसल्याचं पत्र सूचना कार्यालयाच्या तथ्यता पडताळणी विभागानं स्पष्ट केलं आहे. कोणत्याही प्रकारच्या योजनांची तथ्यता पडताळण्यासाठी नागरिकांनी **माय स्कीम डॉट जी ओ व्ही डॉट इन** या संकेतस्थळाला भेट द्यावी असं आवाहन पत्र सूचना कार्यालयानं केलं आहे.

**<><><><><>**

स्वयंपाकाच्या गॅसची काळ्या बाजारातल्या विक्री केल्याप्रकरणी काल लखनऊमध्ये सहा जणांना अटक करण्यात आली. उत्तर प्रदेशच्या अन्न आणि औषध प्रशासनानं राज्यातल्या १ हजार ४८३ ठिकाणी धाडी टाकल्या असून राज्यात कुठेही गॅस सिलींडरचा तुटवडा नसल्याचं म्हटलं आहे. या सहाही आरोपींविरोधात गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. त्याशिवाय वितरकांसह २० जणांविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली आहे.

दरम्यान, गॅसचा पुरवठा सुरळीत व्हावा यासाठी वचनबद्ध असल्याचं भारत पेट्रोलियमनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांना राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांतर्गत झालेली नजरकैद सरकारने तात्काळ प्रभावाने रद्द केली आहे. गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये त्यांना ताब्यात घेण्यात आलं होतं. लडाखमध्ये शांतता, स्थैर्य आणि परस्पर विश्वासाचं वातावरण निर्माण करण्यासाठी सरकार वचनबद्ध असून या उद्दिष्टपूर्तीसाठी नजरकैद रद्द करण्याचा निर्णय घेतल्याचं गृह मंत्रालयाने दिलेल्या यासंबंधीच्या निवेदनात म्हटलं आहे. लडाखमध्ये आवश्यक असलेल्या सर्व सुरक्षा उपाययोजना पुरवणार असल्याचा पुनरुच्चारही मंत्रालयाने आपल्या निवेदनात केला.

**<><><><><>**

एफ.आय.एच. महिला हॉकी विश्वचषक स्पर्धेसाठी होणाऱ्या पात्रता फेरीच्या अंतिम सामन्यात आज भारताचा मुकाबला इंग्लंडशी होणार आहे. हैदराबाद इथल्या बालयोगी स्टेडिअमवर संध्याकाळी साडे सात वाजता सामन्याला सुरुवात होईल. या स्पर्धेत हे दोन्ही संघ आतापर्यंत विजयी ठरले आहेत. मनीषा चौहाननं केलेल्या गोलच्या साहाय्यानं भारतानं इटलीला १-० असं हरवून अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. भारताचा महिला संघ सलग तिसऱ्यांदा विश्वचषकासाठी पात्र ठरला आहे.

**<><><><><>**

बीसीसीआय अर्थात भारतीय क्रिकेट नियामक मंडळातर्फे देण्यात येणाऱ्या कर्नल सी के नायडू जीवनगौरव पुरस्कारासाठी यंदा मंडळाचे माजी अध्यक्ष रॉजर बिन्नी, माजी कर्णधार राहुल द्रविड आणि माजी महिला कर्णधार मिताली राज यांची निवड झाली आहे. दिल्लीमध्ये

उद्या होणाऱ्या नमन पुरस्कार २०२६ या कार्यक्रमात हे जीवनगौरव पुरस्कार दिले जातील. आयसीसी चषक जिंकणाऱ्या पाचही भारतीय संघांना यावेळी गौरविलं जाणार आहे.

<><><><><>

कोकण, गोवा, केरळ आणि माहे येथे आज दिवसभर उष्ण आणि दमट वातावरण राहण्याची शक्यता भारतीय हवामान विभागानं व्यक्त केली आहे. याशिवाय हिमाचल प्रदेशात आज दिवसभर तीव्र उष्णतेची लाट पसरण्याची शक्यता असून झारखंड आणि ओदिशातही दिवसभर वातावरण उष्ण राहण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. गुजरात, पश्चिम हिमालयीन क्षेत्र आणि देशाच्या पूर्व भागात तापमानात 2 ते 4 अंशांची वाढ झाली आहे.

दरम्यान, अरुणाचल प्रदेश, आसाम आणि मेघालयात आज मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. तर राजस्थान, उत्तराखंड, विदर्भ, पश्चिम बंगाल, सिक्कीम आणि इशान्येकडच्या राज्यात वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

<><><><><>

पाकिस्तानी ड्रोननं काल रात्री आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून भारतात प्रवेश केल्यानंतर आज सुरक्षा दलांनी जम्मू काश्मीरमध्ये मोठी शोधमोहीम राबवली. रामनगर परिसरातल्या कंद्राल, अबताल आणि बहादूरपूर या गावात देखरेख ठेवण्यात येत आहे. गेल्या दोन दिवसात तिथं २० कोटी रुपयांचं हेरॉईन जप्त झाल्यानंतर काही संशयित तस्करांना ताब्यात घेतल्याच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई होत आहे.

<><><><><>

महाराष्ट्राच्या अकोला जिल्हा पोलीस दलाने विकसित केलेल्या त्रिनेत्र प्रकल्पाची प्रतिष्ठित स्कॉच पुरस्कारासाठी निवड झाली आहे. शासन, सार्वजनिक प्रशासन आणि नागरी नवकल्पना या क्षेत्रातला हा सर्वोच्च स्वतंत्र सन्मान समजला जातो. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी या प्रकल्पाचं नेतृत्व केलं. हा प्रकल्प एआय-आधारित प्रिव्हेंटिव्ह पोलिसिंग मॉडेल म्हणून देशात लक्षवेधी ठरला आहे.

<><><><><>

पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर दुबईतल्या भारतीय वाणिज्य दूतावासाने भारतात अडकलेल्या परदेशी नागरिकांचा भारतीय व्हिसा आणि ई व्हिसाची मुदत

वाढवण्याची घोषणा केली आहे. तसंच, वाढीव निवासाचं अतिरिक्त शुल्कही माफ केलं आहे. २८ फेब्रुवारीनंतर संपणाऱ्या किंवा या कालावधीत कालबाह्य झालेल्या सर्व प्रकारच्या व्हिसांची मुदत एक महिन्यापर्यंत वाढवण्यात येत आहे. या मुदतीची तारीख व्यक्तिसापेक्ष असेल, असं दुतावासाने आपल्या समाज माध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. परतीसाठीचे परवानेही मोफत दिले जात असून त्यासाठी स्वतंत्र अर्ज न करणं हे स्थलांतर कायद्याचं उल्लंघन मानलं जाणार नसल्याचंही स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

बांगलादेशाच्या तेल जहाजांना होर्मुझच्या सामुद्रधूनीतून जायला परवानगी दिल्याचं इराणनं म्हटलं आहे. इराणचे बांगलादेशचे राजदूत जलील राहिमी यांनी काल ही माहिती दिली. बांगलादेशचे प्रधानमंत्री तारिक रेहमान यांच्या विनंतीवरून ही परवानगी देत असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

इराकची राजधानी बगदाद मधल्या अमेरिकनं दूतावासावर काल इराणच्या क्षेपणास्त्रांनी हल्ला केला. इराणचं एक लढाऊ विमान इराकमध्ये पाडण्यात आल्यानंतर हा हल्ला झाला. या हल्ल्याबाबत अद्याप अमेरिकेनं कोणत्याही प्रकारची प्रतिक्रीया नोंदवली नाही. एका आत्मघातकी ड्रोनच्या सहाय्यानं बगदादमधल्या अमेरिकन दूतावासाची रडार प्रणाली उद्धवस्त करण्यात आल्याचा दावा इराणच्या सरकारी माध्यमानं केला आहे.

दरम्यान, अमेरिकेच्या लढाऊ विमानांमध्ये हवेत इंधन भरणारं केसी १३५ हे विमान काल इराकच्या मैत्रीपूर्ण हवाई मार्गात कोसळलं. या घटनेत विमानातल्या सहा जणांच्या मृत्यू झाला असून या युद्धात आतापर्यंत अमेरिकेचे एकूण १३ सैनिक ठार झाले आहेत. अमेरिकन लष्करानं या घटनेची चौकशी सुरु केली आहे.

**//<><><><><>//**